महाराष्ट्र शासन

# तहसिलदार माळशिरस यांचे कार्यालय

| ई-मेल-tahmalshiras@gmail.com | दूरध्वनी क्रमांक -02185 -235036 |
|---|---|
| क्र.कावि/जमीन/ १००४/२०२३ | दिनांक:- १० जुलै २०२३ |

**संदर्भ :-**

**१.मा. जिल्हाधिकारी,सोलापूर यांचे कार्या.पत्र क्र.कु.का./कार्या-२/कोतवाल /आरआर /६०२ /२०२३ दि.-३०/०६/२०२३**

**जाहीरनामा :-**

सर्व नागरीकांना याव्दारे सुचित करण्यात येते कि, माळशिरस तालुक्यातील खालील तलाठी साझा करीता, त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या प्रवर्गातुन कोतवाल पद भरावयाचे आहे.

| अ.क्र. | कोतवाल पद भरावयाचा साझा | कोतवाल पद भरावयाची संख्या | आरक्षण |
|---|---|---|---|
| १ | तोंडले | ०१ | अनुसूचीत जमाती |
| २ | शिंदेवाडी | ०१ | भटक्या जमाती –ब (भ.ज-ब) |
| ३ | भांबुर्डी | ०१ | भटक्या जमाती –ब (भ.ज-ब) |

उपरोक्त प्रवर्गातील कोतवाल पदाकरिता इच्छुक स्थानिक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यांत येत आहे. तरी उमेदवारांनी विहीत नमुन्यात दोन पासपोर्ट साईज फोटोसहीत अर्ज आवश्यक कागदपत्र व पुराव्यासहीत **दिनांक ११ जुलै २०२३ ते २१ जुलै २०२३ दुपारी ०४.०० वा. पर्यंत (शासकीय सुटीचे दिवस वगळून) या कालावधीत कार्यालयीन वेळेत** तहसिलदार, माळशिरस यांच्या कार्यालयात जमीन शाखेत सादर करावेत व त्याबाबत पोच घ्यावी. अर्जाचा नमुना तहसिल कार्यालयातील जमीन शाखेत कार्यालयीन वेळेत व दिवशी उपलब्ध आहे. विहीत तारखे नंतर येणाऱ्या व अपुर्ण भरलेल्या अर्जाचा तसेच जाहीरनाम्याच्या पूर्वी सादर केलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

## कोतवाल भरती संबंधी वेळापत्रक

1) अर्ज स्विकारण्याची तारीख पुराव्यासहीत **दिनांक ११ जुलै २०२३ ते २१ जुलै २०२३ दुपारी ०४.०० वा. पर्यंत (शासकीय सुटीचे दिवस वगळून) या कालावधीत** कार्यालयीन वेळेत.

2) अर्जाची छाननी दिनांक **२१ जुलै २०२३ दुपारी ०४.००** वाजेपासून **तहसिल कार्यालय, माळशिरस** येथे करण्यांत येईल. पात्र उमेदवारांची यादीची प्रसिध्दी त्याच दिवशी तहसिल कार्यालय, **माळशिरस** यांचे नोटीस बोर्डावर लावण्यांत येईल.

3) पात्र उमेदवारांची लेखी परिक्षा **रविवार** दिनांक **३० जुलै २०२३** रोजी घेण्यांत येईल. परीक्षेचे स्थळ व वेळ **यथावकाश** प्रवेशपत्रामध्ये कळविण्यात येईल. सर्व पात्र उमेदवारांनी आपले अर्जाची **पोचपावतीसह** परिक्षेस उपस्थित रहाणे बंधनकारक आहे.

4) सदर परिक्षेला आपणास कुठलेही पुस्तकी साहित्य, कॅल्क्युलेटर, मोबाईल इत्यादी घेऊन बसता येणार नाही.

1) पात्र उमेदवारांची 100 गुणांची वस्तुनिष्ठ बहुपर्यायी ५० प्रश्नांची लेखी परीक्षा घेण्यांत येईल.त्यानुसार सदर लेखी परीक्षेमध्ये उमेदवारांची प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे निवडसूची तयार करून निवडसूचीतील पात्र उमेदवारांची गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल.

## कोतवाल भर्तीसाठी पात्रता व अटी पुढील प्रमाणे

2) उमेदवार ज्या सजेसाठी अर्ज करीत आहे. त्या सजेतील अंतर्भूत असणाऱ्या गावामधील रहिवासी असणे आवश्यक आहे. उमेदवाराने स्थानिक जागेचा रहिवाशी असल्याबाबतचे (घर टॅक्स पावती/निवडणूक ओळखपत्र/मनरेगा अंतर्गत जॉब कार्ड/पॅन कार्ड/आधार कार्ड) यापैकी एखादा पुरावा जोडणे आवश्यक आहे. या व्यतिरिक्त इतर कुठलाही पुरावा ग्राहय धरला जाणार नाही.

3) उमेदवाराचे वय जाहीरनाम्याच्या दिनांकाला कमीत कमी 18 वर्ष व जास्तीत जास्त 40 वर्ष या दरम्यान असावे. (पुराव्या दाखल जन्म तारखेचा दाखला / शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र / पॅन कार्ड /ड्रायव्हींग लायसन्स, यापैकी एखादा पुरावा जोडणे आवश्यक आहे.) या व्यतिरिक्त इतर कुठलाही पुरावा ग्राहय धरला जाणार नाही.

4) उमेदवारांची शैक्षणिक पात्रता इयता 4 थी पास असणे आवश्यक आहे.

5) उमेदवार शारिरिक दृष्टया सक्षम असावा,नियुक्ती नंतर जिल्हा मेडिकल बोर्डाचे /चिकीत्सक प्रमाणपत्र 1 (एक) महिन्यात उमेदवाराला सादर करावे लागेल. त्याची जबाबदारी उमेदवाराची असेल. सदर प्रमाणपत्र 1 (एक) महिन्यात प्रमाणपत्र सादर न केल्यास सदरची निवड रद्द करण्यांत येईल.

6) उमेदवाराने चारित्र्याबाबत सबंधित पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांचे प्रमाणपत्र नियुक्ती नंतर सादर करावे. सदर प्रमाणपत्र 1 (एक) महिन्यात प्रमाणत्र सादर न केल्यास सदरची निवड रद्द करण्यांत येईल.

7) सक्षम अधिकाऱ्याचे जातीचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. जातीचे प्रमाणपत्र न जोडल्यास अर्ज अपात्र ठरविण्यांत येईल. तसेच उमेदवाराला नियुक्ती झाल्यास नियुक्ती दिनांकापासुन सहा महिन्याचे आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. विहीत कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास पुर्व सुचना न देता कोणतेही कारण न देता कोणत्याही वेळी नियुक्ती रद्द (समाप्त) करण्यात येईल.( आरक्षण पदाच्या बाबतीत)

8) अर्जासोबत कुठल्याही राजकीय पक्षाची शिफारस जोडलेली नसावी. अन्यथा आपला अर्ज अपात्र ठरविण्यांत येईल. तसेच निवड प्रक्रिये दरम्यान कुठलाही दबाव आणल्यास आपली निवड रद्द करण्यांत येईल.

9) अर्ज हा अर्जदारानेच वैयक्तिक स्वतः हजर राहून सादर करावा. अर्ज पोस्टाव्दारे पाठविण्यात येवु नये.

10) अपुर्ण माहीतीचे अर्ज रद्य करण्यात येईल. त्याबाबत कोणतेही पत्र व्यवहावर करण्यात येणार नाही.

11) अर्जामधील महिती खोटी आढळल्यास अर्ज रद्द करण्यात येईल. किंवा नियुक्ती झाल्यानंतर ती रद्य करण्यात येईल.

12) कोतवाल हे पद अवर्गीकृत पद असुन शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या शासन निर्णयानुसार मानधन देय राहील.

13) कोतवाल पदासाठी होणारी परीक्षी ही वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाच्या सामान्य ज्ञानावर आधारित प्रश्नांची राहील.

14) विहीत नमुन्यातील अर्ज तहसिल कार्यालय,माळशिरस येथे **रुपये 20/-शुल्क** भरुन उपलब्ध होईल. (विहीत नमुन्यातील अर्जच स्विकारण्यात येतील.)

15) ज्या अर्जदाराचे अर्ज पात्र ठरतील त्याच उमेदवारांची 100 गुणांची वस्तुनिष्ठ बहुपर्यायी ५० प्रश्नांची लेखी परीक्षा घेण्यांत येईल.त्यानुसार सदर लेखी परीक्षेमध्ये उमेदवारांची प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे निवडसूची तयार करून निवडसूचीतील पात्र उमेदवारांची गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल.

16) प्रकिया शुल्क :- उमेदवारांनी खालीलप्रमाणे प्रक्रिया शुल्क भरणे आवश्यक आहे.

| **प्रवर्ग** | **मागास प्रवर्गातील उमेदवारांसाठी** |
|---|---|
| **परिक्षा शुल्क** | रु. 300/- (**रु.तिनशे मात्र/-**) |

17) अर्जदाराला निवड प्रक्रियेसाठी स्वखर्चाने यावे लागेल.

वरिल सर्व अटी व शर्तींना अनुसरुन निवड समितीचा व जिल्हाधिकारी, सोलापूर यांचा निर्णय अंतिम राहिल.

**दिनांक -१० जुलै** 2023

सही xxx

**(सुरेश शेजूळ)**

**तहसिलदार, माळशिरस तथा**

**सदस्य सचिव,कोतवाल भरती-२०२३**

प्रतिलीपी :- **माहिती करीता सविनय सादर.**

1) मा. जिल्हाधिकारी, सोलापूर

2) मा. उप विभागीय अधिकारी, माळशिरस विभाग, अकलूज तथा सदस्य सचिव, कोतवाल भरती-२०२३

**माहिती तथा नमुद दिलेल्या कार्यवाहीस्तव अग्रेषीत.**

प्रतः-

1. जिल्हा सुचना व विज्ञान अधिकारी जि. का. सोलापूर यांनी NIC वर सदर जाहिरनाम्याची एक प्रत प्रसिध्द करावी.
2. गट विकास अधिकारी पंचायत समिती, माळशिरस यांनी नोटीस बोर्डावार लावुन प्रसिध्द करावी व प्रसिध्दी प्रतिवेदन या कार्यालयास सादर करावे.
3. मुख्याधिकारी, नगर परिषद अकलूज यांनी नोटीस बोर्डावार लावुन प्रसिध्द करावी व प्रसिध्दी प्रतिवेदन या कार्यालयास सादर करावे.

4. मुख्याधिकारी नगर पंचायत माळशिरस/ नातेपुते / महाळुंग-श्रीपूर यांनी नोटीस बोर्डावार लावुन प्रसिध्द करावी व प्रसिध्दी प्रतिवेदन या कार्यालयास सादर करावे.
5. तलाठी साझा तोंडले / शिंदेवाडी / भांबुर्डी यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित. आपण जाहीरनाम्याची प्रत आपले कार्यालयातील सुचना फलकावर लावून व साझ्यातील सर्व गावांत तशी प्रसिध्दी / मुनादी देवून त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.
6. सचिव ग्रामंपचायत तोंडले / शिंदेवाडी / भांबुर्डी यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित. जाहीरनाम्याची प्रत आपले कार्यालयातील सुचना फलकावर लावून प्रसिध्दी अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.
7. शिपाई,तहसिल कार्यालय, माळशिरस यांना आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित. जाहीरनाम्याची प्रत आपले कार्यालयातील सुचना फलकावर लावून प्रसिध्दी अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.

(सुरेश शेजूळ)
तहसिलदार, माळशिरस तथा
**सदस्य सचिव,कोतवाल भरती-२०२३**